**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

# प्रसिद्धी विभाग

# शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## क्रीडा विभाग

लोकमत

## क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धा

### राजगुरुनगरला स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरू जयंतीचे औचित्य साधून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वरिष्ठ व कनिष्ठ गटातील स्पर्धेत २०० स्पर्धकांनी सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्‌घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, चांडोली ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. गावडे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर, प्रबंधक कैलास पाचरणे उपस्थित होते.



मॅरेथॉन स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

विद्यार्थ्यांसाठी पाच कि.मी. तर विद्यार्थिनींसाठी तीन कि.मी. अशी स्पर्धा झाली. वरिष्ठ गटात मुलांमध्ये राहुल पारधी, हर्षद गाडे, संकेत भोईर यांचा तर मुलींमध्ये साक्षी भांबुरे, श्रावणी गाढवे, रोहिणी पुंडगे यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आला. कनिष्ठ गटात मुलांमध्ये रोहन कोरडे, तनिष भोकसे, गौतम चौधरी यांनी तर मुलींमध्ये समृद्धी वाळुंज, प्रांजल पिसाळ व श्रावणी लंगोटे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. विजयी खेळाडूंचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. तसेच नूतन पोलिस निरीक्षक व पोलिस झालेल्या विद्यार्थी खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात आला. मागील वर्षात १९ विद्यार्थ्यांनी क्रीडा शिष्यवृत्तीचा लाभ घेतला आहे. स्पर्धेचे आयोजन प्रा.प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.मच्छिंद्र मुळूक तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Aug 31, 2024
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेला प्रतिसाद

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरू जयंतीचे औचित्य साधून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वरिष्ठ व कनिष्ठ गटातील स्पर्धेत २०० स्पर्धकांनी सहभाग घेतला.



स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, चांडोली ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. गावडे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम.जरे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर, प्रबंधक कैलास पाचरणे उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी पाच कि.मी. तर विद्यार्थिनींसाठी तीन कि.मी. अशी स्पर्धा झाली.

वरिष्ठ गटात मुलांमध्ये राहुल पारधी, हर्षद गाडे, संकेत भोईर यांचा तर मुलींमध्ये साक्षी भांबुरे, श्रावणी गाढवे, रोहिणी पूंडगे यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आला.कनिष्ठ गटात मुलांमध्ये रोहन कोरडे, तनिष भोकसे, गौतम चौधरी यांनी तर मुलींमध्ये समृद्धी वाळुंज, प्रांजल पिसाळ व श्रावणी लंगोटे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी विद्यार्थी खेळाडूंना जिद्दीने, स्वकष्टाने क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. या स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.मच्छिंद्र मुळूक तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी केले.

Pimpri Chinchwad Edition Edition
Aug 31, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

# मैराथन स्पर्धा में 200 धावकों ने लिया भाग

भास्कर न्यूज | राजगुरुनगर



खेड़ तालुका शिक्षण प्रसारक मंडल के हुतात्मा राजगुरु महाविद्यालय में राष्ट्रीय खेल दिवस और शहीद राजगुरु की जयंती के अवसर पर मैराथन स्पर्धा आयोजित की गई थी। इसमें जुनियर व सीनियर ग्रुप में 200 धावकों ने भाग लिया।

छात्रों के लिए 5 किमी और छात्राओं के लिए 3 किमी की स्पर्धा हुई। सीनियर ग्रुप के लड़कों में राहुल पारधी, हर्षद गाडे, संकेत भोईर और लड़कियों में साक्षी भाबुरे श्रावणी गाढवे, रोहिणी पुंडगे ने क्रमशः प्रथम, द्वितीय और तृतीय स्थान प्राप्त किया। जुनियर ग्रुप के लड़कों में रोहन कोरडे, तनिष भोकसे, गौतम चौधरी और लड़कियों में समृद्धि वालुंज, प्रांजल पिसाल व श्रावणी लंगोटे ने क्रमशः प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त किया। विजेता खिलाड़ियों को सम्मानचिन्ह व सम्मानपत्र दिया गया।

दैनिक भास्कर
Fri, 30 August 2024
https://epaper.bhaskarhindi.com/c/75747247

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

समर्थ भारत वृत्तसेवा





**राजगुरूनगर ता. २९ :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरू जयंतीचे औचित्य साधून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वरिष्ठ व कनिष्ठ गटातील स्पर्धेत २०० स्पर्धकांनी सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, चांडोली ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. गावडे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर, प्रबंधक कैलास पाचरणे उपस्थित होते.

वरिष्ठ गटात मुलांमध्ये राहुल पारधी, हर्षद गाडे, संकेत भोईर यांचा तर मुलींमध्ये साक्षी भांबुरे, श्रावणी गाढवे, रोहिणी पूंडगे यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आला.कनिष्ठ गटात मुलांमध्ये रोहन कोरडे, तनिष भोकसे, गौतम चौधरी यांनी तर मुलींमध्ये समृद्धी वाळुंज, प्रांजल पिसाळ व श्रावणी लंगोटे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. विजयी खेळाडूंचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. तसेच नूतन पोलीस निरीक्षक व पोलीस झालेल्या विद्यार्थी खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात आला.

संस्थाध्यक्ष ॲड देवेंद्र बुट्टे पाटील यांनी विद्यार्थी खेळाडूंना जिद्दीने, स्वकष्टाने क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. संस्थेच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना खेळाकडे आकर्षित करून त्यांना उत्कृष्ट कामगिरी करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येत असल्याचे सांगितले. मागील शैक्षणिक वर्षात १९ विद्यार्थ्यांनी क्रीडा शिष्यवृत्तीचा लाभ घेतला असून क्रीडा क्षेत्रात करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीमागे संस्था भक्कमपणे उभी असल्याचे त्यांनी सांगितले. या स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.मच्छिंद्र मुळूक तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी केले.

केसरी

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेला प्रतिसाद

**राजगुरूनगर,(वार्ताहर)**: येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरू जयंतीचे औचित्य साधून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

वरिष्ठ व कनिष्ठ गटातील स्पर्धेत २०० स्पर्धकांनी यामध्ये सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, चांडोली ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. गावडे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ.एच. एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांसाठी पाच कि.मी. तर विद्यार्थिनींसाठी तीन कि.मी. अशी स्पर्धा झाली. वरिष्ठ गटात मुलांमध्ये राहुल पारधी, हर्षद गाडे, संकेत भोईर यांचा तर मुलींमध्ये साक्षी भांबुरे, श्रावणी गाढवे, रोहिणी पूंडगे यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आला. या स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते यांनी केले. या कार्यक्रमाचे



सूत्रसंचालन प्रा.मच्छिंद्र मुळूक यांनी केले. आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख

HRM